पिंपरी चिंचवड महानगरपालिका

इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९

जा.क्र.इक्षेका/४/कावि/८२२ /२०१७

दि.२०/०२ /२०१७

प्रति,

मा.----------------------------
सदस्य/सदस्या
इ प्रभाग समिति
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी-३९.

**विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ०१/०३/२०१७ रोजी दुपारी ०३.०० वा. आयोजित केलेबाबत.**

**महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग **समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ०१/०३/२०१७ रोजी दुपारी ०३.०० वा.** इ क्षेत्रीय कार्यालयाचे **“ संत ज्ञानेश्वर महाराज”** सभागृहात आयोजीत करणेत आली आहे. सभेस आपण उपस्थित राहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

प्रत –

१) सर्व संबंधित शाखाप्रमुख

२) कार्यालयीन नोटीस बोर्ड.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग समिति
कार्यपत्रिका क्रमांक – १२

दिनांक- **०१/ ०३ /**२०१**७** रोजी दुपारी - ०३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **बुधवार दिनांक ०१/०३/२०१७ रोजी दु.** ०३.०० वाजता इ क्षेत्रीय कार्यालयातील **“ संत ज्ञानेश्वर महाराज”** सभागृहात आयोजीत करणेत आली **आहे**. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दिनांक ०४/०१/२०१७ रोजी झालेल्या सभेचा कार्यक्रमपत्रिका ०९ व १० सभावृतांत कायम करणे.

**विषय क्र. १ -** मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.इक्षे/०२/कावि/६७/१७, दिनांक ०७/०२/२०१७

प्रभाग क्र. २९ इंद्रायणीनगर,व प्रभाग क्र. ३० चक्रपाणी वसाहत हगणदारी मुक्त घोषीत करणेसंबंधी विशेष क्षेत्रीय सभेचे आयोजन करणेबाबत.

केंद्रशासनाने देशातील सर्व शहरामधील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळणे याकरीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणेचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासून स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/२०१५/प्रक्र.२३/नवि/३४, दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दिष्ट निश्चीत केलेले आहे. तसेच मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/ ९६/ २०१६ दिनांक १/४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पुर्वी टप्प्या टप्प्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चीत केलेले आहे.त्या अनुषंगाने इ क्षेत्रिय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. २९ इंद्रायणीनगर, व प्रभाग क्र. ३० चक्रपाणी वसाहत हे दोन प्रभाग दि. ३१/०३/२०१७ पूर्वी हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषीत करणेस मान्यतेकामी ठेवण्यात यावा.

मा.सभापती यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय घेणे.

प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/८२२/२०१७
दिनांक- २०/०२/२०१७